| | |
|---|---|
| **CNR MHLA120037792022** | सं.फौ.खटला क्र.४२३/२०२२<br>शासन वि. उमाकांत |

**<u>फौजदारी प्रक्रिया संहितेच्या (१९७४ चा अधिनियम दोन) प्रकरण एकवीस अन्वये गुन्हयाचे विवरण</u>**

**<u>न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, निलंगा यांचे न्यायालय</u>**

**सं.फौ.खटला क्र.४२३/२०२२** **निशाणी क्र.**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | गुन्ह्याची तारीख | - | १०/०८/२०२२ |
| २. | नोंदणी तारीख | - | ०८/११/२०२२ |
| ३. | फिर्यादीचे नांव | - | महाराष्ट्र सरकार,<br>तर्फे पो.नि. शिरुर अनंतपाळ पो.स्टेशन |
| ४. | आरोपीचे नाव, वय व पत्ता. | - | उमाकांत नामदेव चव्हाण<br>वय :- २६वर्षे,<br>रा.ढोबळेवाडी, ता. निलंगा, जि. लातूर |

५. गुन्ह्याची थोडक्यात हकीकतः-

तुम्ही दि.१०/०८/२०२२ रोजी १७.३० वाजणेच्या सुमारास ढोबळेवाउी येथील जिल्हा परिषद शाळेच्या समोर रोडवर आरोपी हे त्यांचे आर्थिक फायदेसाठी लोकांकडून पैसे घेवून ते आकडयावर लावून मिलन डे व कल्याण मटका नावाचा जुगार खेळत व खेळवीत असताना मिळून आले. अशाप्रकारे तुम्ही महाराष्ट्र जुगार अधिनियम १२ (अ) खालील गुन्हा या न्यायालयाच्या कार्यक्षेत्रामध्ये केला आहे.

**(आर.डी. खराटे)**

दि.०१/०७/२०२४ न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, निलंगा.

**<u>आरोपीचे प्रतिकथन</u>**

प्रश्न १ - तुम्हाला पोलीस पेपर्सच्या कॉपीज मिळाल्या का?

उत्तर - होय.

प्रश्न २ - तुम्हाला वाचून दाखविलेले तुमच्यावरील गुन्हयाचा मजकूर तुम्हाला समजला का?

उत्तर - होय

प्रश्न ३ - तुम्हाला गुन्हा कबूल आहे काय?

उत्तर - होय, मला गुन्हा कबूल आहे.

**आरोपीची सही**

**( आर.डी. खराटे)**

दि.०१/०७/२०२४ न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, निलंगा.

## न्यायनिर्णय

सदर आरोपींविरुध्द महाराष्ट्र जुगार अधिनियम १२ (अ) खालील आरोपाबाबत प्रकरण दाखल केलेले आहे. आरोपींनी स्वेच्छेने गुन्हा कबूल करून दया दाखविणेस विनंती केली आहे. आरोपींनी स्वेच्छेने गुन्हा कबूल केला असल्यामुळे सरकारपक्षाची केस निर्विवादपणे सिध्द झालेली आहे. त्यामुळे आरोपींना सदर गुन्हयाकरीता दोषी धरण्यात येत आहे. आरोपींचे म्हणणे ऐकले. आरोपींचा पहिलाच गुन्हा असल्याचे कागदपत्रावरून स्पष्ट होते. त्यामुळे आरोपींचा पहिला गुन्हा असल्यामुळे तसेच ते त्यांचे कुटुंबातील एकमेव कर्ता/कमावते इसम असल्यामुळे खालील शिक्षा न्याय होईल. करीता खालीलप्रमाणे आदेश करण्यात येतो.

## आदेश

आरोपी **उमाकांत नामदेव चव्हाण** यांना फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २५२ अन्वये भारतीय दंड संहिता कलम महाराष्ट्र जुगार अधिनियम १२ (अ) च्या आरोपाकरीता दोषी धरून सदर गुन्हयाबद्दल आरोपींना न्यायालयीन कामकाजाची वेळ संपेपर्यंतची शिक्षा व प्रत्येकी रक्कम रु.३००/- (अक्षरी रूपये तीनशे मात्र) द्रव्यदंड ठोठावण्यात येत आहे. आरोपींनी सदर दंडाची रक्कम न भरल्यास २ दिवसाची साध्या कारावासाची शिक्षा भोगावयाची आहे.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
Digitally signed by REENA DEEPAK KHARATE
Date: 2024.07.02 17:41:50 +0530

**(आर.डी. खराटे)**

दि.०१/०७/२०२४ न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, निलंगा.